# सिन्नरचे गोंदेश्वर मंदिर




Mahesh Naik



# सिन्नरचे गोंदेश्वर मंदिर

लेखन : महेश गंगाराम नाईक
https://www.maheshnaik.com
Email - author@maheshnaik.com

## कृष्णाख्यान - महामानव कृष्णाचे चरित्र




**या आधी माझे "कृष्णाख्यान - महामानव कृष्णाचे चरित्र" हे पुस्तक प्रसिद्ध झाले असून हे पुस्तक अमेझॉन व इतरत्र उपलब्ध आहे . त्याचा बार कोड व  लिंक येथे देत आहे. तेथून तुम्ही ते पुस्तक घेऊ शकता.**

थेट अमेझॉन वर जाण्यासाठी लिंक

भारतीय मनावर श्रीकृष्ण या नावाची मोहिनी गेली किमान पाच सहस्रके कायम आहे. प्रत्येकाचा त्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असला तरी या सर्वांचे भारावलेपण हा त्यातील सामायिक दुवा आहे. कुणी त्याची भक्ती करते, तर कुणी त्यात राजकारणधुरंधर व्यक्तिमत्त्व शोधते. त्याच्या कार्याचा आवाका, त्याची निर्णयक्षमता इतकी विलक्षण आहे की, आपण चकित झाल्याशिवाय रहात नाही. आणि मग आज पाच हजार वर्षांनंतर जर आपली ही परिस्थिती असेल तर ज्या काळात तो जगला तो व त्याच्यानंतर लगतचा काळ यात तो दंतकथा बनून राहिला नसता तरच नवल. त्याच्या कार्यकर्तृत्वावर चमत्कारांची आवरणे चढत गेली. वास्तविक पाहता त्याच्या कार्याला यातील कोणत्याही आवरणाची आवश्यकता नाही असे त्याचे कर्तृत्व निर्विवाद होते. भौतिक नियमांच्या चौकटीतच राहून त्याने त्याची अचाट कार्ये केली अन् त्याच्यावर प्रेम करणाऱ्या हजारो भक्तगणांनी त्याला 'भगवंत बनविण्यासाठी' ही भौतिक नियमांची आणि तर्कवादाची चौकट मोडून टाकली आणि त्याच्याकडून त्याने कदाचित कधीही न केलेली अचाट कामेदेखील करून घेतली!

कृष्णाख्यान कशासाठी ?

- कृष्णाचे मानवी रूप समजून घेण्यासाठी.
- चमत्कार विरहीत कृष्ण समजून घेण्यासाठी,
- कृष्ण चरित्रातील चमत्कारांची कारणमीमांसा जाणून घेण्यासाठी.
- मानवी पातळीवर महाभारत कसे घडले असेल हे कृष्ण-चरित्राद्वारे समजावून घेण्यासाठी.
- कृष्ण किती वर्षे जगाला? त्याच्या आयुष्यातील कोणत्या घटना त्याच्या वयाच्या कोणत्या वर्षी घडल्या? या प्रश्नांची उत्तरे सप्रमाण मिळविण्यासाठी.
- कृष्णाचे संपूर्ण चरित्र समजून घेण्यासाठी.

**या ई पुस्तकाचे लेखन करण्याकरिता अनेकांची मदत झाली. त्यामुळे हे ई पुस्तक त्या सर्वांना समर्पित आहे व पूर्णपणे मोफत उपलब्ध आहे . या लेखनाचे कोणतेही हक्क मी राखून ठेवलेले नाहीत . पण जर तुम्ही हे लेखन, माहिती कोठे वापरणार असाल तर डॉ. गोपाळ जोगे सरांचा, माझा, तसाच सह्याद्री सामाजिक संस्था यांचा उल्लेख केल्यास मला आवडेल. वेळोवेळी माझ्या माहितीत जशी भर पडेल तशी मी माहिती व छायाचित्रे वाढवीत जाईन, जेणेकरून यात काही त्रुटी असतील तर त्या दुरुस्त होऊन उत्तम माहिती सर्वांना उपलब्ध होऊ शकेल .**

**लेखन - महेश गंगाराम नाईक, प्रथमावृत्ती, २७ ऑगस्ट २०२४**

## ऋणनिर्देश

हा अभ्यास करण्याकरिता मला अनेकांनी मदत केली. या निमित्ताने सर्वांचा नामनिर्देश करणे शक्य नसले तरी काही महत्त्वाच्या व्यक्तींचे आभार यावेळी मानायलाच हवे.

गोंदेश्वर मंदिर हे जरी पुरातन मंदिर असले तरी या मंदिराचे फारच त्रोटक उल्लेख आपल्याला आढळून येतात. त्यामुळे या मंदिराबद्दलची माहिती म्हणजेच मंदिराचा कालावधी, मंदिराची शैली, त्यावर असलेल्या मुर्त्यांची अंकने, त्यांच्या कथा यांची माहिती उपलब्ध नव्हती. ती माहिती मुख्यत्वेकरून उपलब्ध झाली ती सह्याद्रि ट्रेकर्स या संस्थेनं आयोजित केलेल्या मंदिरविषयक अभ्यासक्रमामुळे व या अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक डॉ. गोपाळ जोगे यांच्यामुळे. **श्री डॉ. गोपाळ जोगे** (Department of AIHC & Archaeology, Deccan College, PGRI, Pune-06) यांच्या मार्गदर्शनाखाली या मंदिराची भेट घडली आणि माहितीचा एक अमूल्य खजिना माझ्या हाती लागला. या माहितीशिवाय हा अभ्यास पूर्ण होणे अशक्यच होते.

या मंदिराला वेळोवेळी भेट देऊन त्याचा विविधांगी अभ्यास करण्यासाठी माझी सुविद्य पत्नी सौ मनीषा हिने व माझी कन्या कु. मनस्वी हिने मला साथ दिली. कु. मनस्वी हिने माझ्यासाठी काही उत्तम छायाचित्रण देखील केले व म्हणूनच या दोघींचेही विशेष आभार मला मानायला हवेत.

## गोषवारा

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर या शहरात ११ व्या शतकातील प्राचीन शिवमंदिर आहे. पंचायतन प्रकारातील सुस्थितीत असलेले महाराष्ट्रातील हे एकमेव मंदिर. भूमिज शैलीत बांधलेले हे मंदिर बाह्यांगावर अतिशय उत्तमोत्तम शिल्पाकृतींनी नटलेले आहे. या मंदिराचा इतिहास, याच्या बांधकामाची शैली, मंदिरावर असलेला विविध धर्म पंथांचा प्रभाव, आणि या मंदिराच्या बाह्यांगावरील मूर्तींचा या अभ्यास-प्रकल्पाद्वारे वेध घेण्याचा एक प्रयत्न यात केलेला आहे.

हे मंदिर जरी पुरातन असले आणि महाराष्ट्रातील पंचायतन मंदिरांपैकी सुस्थितीत असलेले एकमेव मंदिर असले तरी या मंदिराचा म्हणावा तसा अभ्यास झालेला दिसत नाही अथवा ऑनलाईन माहितीदेखील फारशी आढळत नाही. अशा परिस्थितीत हि माहिती मिळविले हे एक आव्हानच होते पण डॉ. गोपाळ जोगे यांच्या मदतीने याबद्दलचा थोडाबहुत अभ्यास करणे मला शक्य झाले. या मंदिराचा सांगोपांग अभ्यास करून त्यावर एखादे पुस्तक प्रसिद्ध करणे एखाद्या मंदिर अभ्यासकाला सहज शक्य आहे.

नाशिक पासून २६ किमी अंतरावर असणाऱ्या या मंदिराला भेट देणे तसे सहज शक्य आहे. अशा २ भेटी देऊन आवश्यक असणारी माहिती मिळवायचा व ती नेटकेपणा मांडायचं प्रयत्न मी माझ्या अल्पमतीप्रमाणे यात केलेला आहे.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| सिन्नरचे गोंदेश्वर मंदिर | 1 |
| अनुक्रमणिका | 5 |
| प्रकरण १: अभ्यासपद्धती व उपलब्ध साहित्याचा आढावा | 6 |
| प्रकरण २: सिन्नरच्या परिसरात | 7 |
| प्रकरण ३: सिन्नर परिसराचा इतिहास | 10 |
| प्रकरण ४: मंदिर स्थापत्य | 13 |
| प्रकरण ५: मंदिराचे मुख्य भाग | 26 |
| प्रकरण ६: मंदिराची अंतर्गत रचना | 33 |
| प्रकरण ७: उल्लेखनीय मूर्ती | 43 |
| प्रकरण ८. उपसंहार | 66 |
| संदर्भ | 67 |

# प्रकरण १: अभ्यासपद्धती व उपलब्ध साहित्याचा आढावा

हे छोटेखानी ई पुस्तक लिहिण्याकरिता मी ज्या संदर्भांचा वापर केला त्याबद्दल लिहिणे क्रमप्राप्तच आहे. या विषयाचे संदर्भ विकिपीडिया या आंतरजालावर उपलब्ध असले तरी ते फारच त्रोटक आहेत. या संदर्भात कोणताही संशोधनलेख (पेपर) मला उपलब्ध झाला नाही तरी काही संदर्भपुस्तकांची यादी आंतरजालावर उपलब्ध झाली. ती पुस्तकेदेखील उपलब्ध झाली व त्याचा वापर मी माहिती मिळविण्यासाठी केला तरी ही माहिती अतिशय त्रोटक आहे व सर्वच पुस्तकांमध्ये, तसेच नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर विषयक गॅझेटमध्ये थोड्याफार फरकाने सारखीच मिळते आणि त्यामुळे या माहितीसाठी इतर मंदिरविषयक पुस्तके, पुराणकथा यांचा वापर करावा लागला.

सिन्नरच्या गोंदेश्वर मंदिराची रचना अंबरनाथ च्या गोंदेश्वर मंदिरासारखीच असल्याने मंदिराच्या स्थापत्यशैलीचा अभ्यास करण्यासाठी डॉ. सौ. कुमुद कानिटकर यांच्या "अंबरनाथ शिवालय" या पुस्तकाची बरीच मदत झाली. या मंदिरांची शैली सारखी असली तरी दोन्ही मंदिरांच्या बाह्यभागावरील अंकनांमध्ये बराच फरक असल्याने, मूर्तींची ओळख मात्र या पुस्तकाद्वारे होत नाही. या व इतर सर्व संदर्भग्रंथांची यादी या लेखाच्या शेवटी दिली आहे.

**पण ही उणीव डॉ. गोपाळ जोगे या मंदिर अभ्यासकांनी भरून काढली**. त्यांनी आपला बहुमूल्य वेळ देत हे मंदिर पूर्ण दाखवले आणि त्याचबरोबर या मंदिरातील बऱ्याच मुर्त्यांची ओळखदेखील करून दिली.

मंदिराचा अभ्यास करताना मंदिराला दोन वेळा भेटी दिल्या व त्याच्या नोंदी ठेवल्या. पहिल्या भेटीच्या वेळी मंदिराची रचना कशी आहे, त्यात कोणत्या ठिकाणी मुर्त्या आहेत व त्या काय आहेत हे जाणून घ्यायचा प्राथमिक प्रयत्न केला. मंदिराच्या नकाशाचे रेखाटन तयार केले. त्याच्या भोवतीच्या पंचायतन मंदिरांमध्ये असलेल्या मुर्त्या, त्याच्या बाह्य भिंतीवरील मुर्त्या, मुख्य मंदिरातील मंडपाच्या खांबाची रचना आणि त्यावरील मुर्त्या यांच्या केवळ नोंदी करून ठेवल्या. याचवेळी या नोंदीबरहुकूम असंख्य छायाचित्रे घेतली. या नोंदी ठेवताना मंदिराचा कोणता भाग पाहतो आहे, त्याचे नाव काय आहे आणि त्या भागात कोणत्या मुर्त्या आहेत याची नोंद ठेवत गेलो. त्यामुळे अखेरीस या मुर्त्या व त्यांच्या जागा या ताडून पाहता आल्या. पहिल्यांदा जाण्यापूर्वी, **'मंदिर कसे पाहावे'** या देगलूरकर सरांच्या पुस्तकांचेही वाचन केले.

त्यामुळे दुसऱ्यांदा तज्ज्ञांबरोबर जाताना मिळालेली बऱ्याचशा माहितीची नोंद टिपून ठेवता आली. त्याचबरोबर जमेल त्या माहितीचे रेकॉर्डिंग पण करत गेलो. यातूनच बराच फायदा झाला. पण असे असले तरी हि माहिती परिपूर्ण नाही याची मला जाणीव आहे.

पुस्तकांबरोबरच अनेक ऑनलाईन माहितीचा मी यात वापर केला. या वेबसाईट्स च्या लिंक देखील मी वेळोवेळी लेखात आणि संदर्भ सूची मध्ये दिलेल्या आहेत.

# प्रकरण २: सिन्नरच्या परिसरात

नाशिक या ऐतिहासिक शहरापासून **सिन्नर** हे नाशिक जिल्ह्यातील स्वतः नाशिक आणि मालेगाव नंतर तिसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. प्रवरा आणि गोदावरी या दोन नद्यांच्या परिसरात सिन्नर शहर वसलेले आहे, तर गोदावरी नदीच्या तीरावर वसलेले नाशिक पंचवटी या रामायणकालीन स्थानामुळे तसेच अनेक मंदिरांच्या अस्तित्वामुळे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर मानले जाते. दर १२ वर्षांनी येथे होणाऱ्या कुंभमेळ्यामुळे देखील नाशिक शहराला अनन्यसाधारण धार्मिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**गोंदेश्वर मंदिर** हे ठिकाण पुण्यापासून सुमारे १८५ किमी (३.५ तास) आणि नाशिकपासून सुमारे २६ किमी अंतरावर असलेल्या सिन्नर शहरात आहे. गोंदेश्वर मंदिर हे मध्ययुगीन भारताच्या वास्तुशिल्पीय प्रगतीचा आणि आध्यात्मिक प्रेरणेचा पुरावा आहे. त्याची उत्पत्ती १२व्या शतकात, यादव घराण्याच्या कारकिर्दीत, झाली असल्याचे आपल्याला या प्रदेशाच्या इतिहासाचा अभ्यास करताना लक्षात येते. यादव घराण्याच्या आश्रयाखाली, गोंदेश्वर धार्मिक उपासनेचे आणि सांस्कृतिक संरक्षणाचे केंद्र म्हणून भरभराटीला आले, जेणेकरून संपन्न यादवांच्या संरक्षणाखाली येथे भक्त आणि कारागीर आकर्षित होत गेले.

सिन्नर शहर मध्ययुगीन काळात व्यापार, संस्कृती आणि धार्मिक क्रियाकलापांचे गजबजलेले केंद्र होते. उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणाऱ्या व्यापारी मार्गांवरील त्याच्या मोक्याच्या स्थानामुळे विचार, वस्तू आणि सांस्कृतिक प्रभावांची देवाणघेवाण सुलभ झाली, ज्यामुळे सिन्नरला विविध परंपरांच्या एकत्रीकरणाच्या केंद्र तयार झाले. महानुभाव संप्रदायाचे चक्रधर स्वामींची भक्ती करणारे एक मोठे केंद्र देखील या ठिकाणी असल्याने विविध संस्कृतींचा संगम आपल्याला येथे आढळून येतो.

गोंदेश्वरच्या ऐतिहासिक केंद्रस्थानी जात असताना आपण इतिहास, परंपरा आणि अध्यात्माचे स्तर उघडतो जे त्याच्या पवित्र परिसरात सतत गुंजत राहतात. या प्राचीन मंदिराच्या आणि महाराष्ट्रातील सिन्नर शहराच्या सभोवतालच्या समृद्ध वारशाचा शोध घेण्याचा एक लहानसा प्रयत्न या अभ्यासाद्वारे केलेला आहे.

पौराणिक काळात मौनीनाथांच्या चरित्रात या शहराला ब्रह्मपुरी म्हटले आहे. राज्यात सातवाहनांनी जी काही शहरे वसविली त्यापैकी एक सीरीनगर म्हणजे सिन्नर होय. यानंतरच्या काळात राष्ट्रकूट आणि पश्चिमी चालुक्यांचाही प्रभाव या शहरावर राहिला.

## गारगोटी स्फटिक संग्रहालय

गारगोटी स्फटिक संग्रहालय हे सिन्नरमधील आणखी एक महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ आहे, जे सिन्नर बस स्थानकापासून ६ किमी अंतरावर आहे. हे जगातील सर्वोत्कृष्ट खनिज संग्रहालयांपैकी एक आहे ज्यामध्ये जिओलाइट्सचा मोठा संग्रह असून ते योग्य प्रकारे परिभाषित केलेले आहेत . माजी नौदल अधिकारी श्री कृष्णचंद्र पांडे यांनी स्थापन केलेल्या या संग्रहालयाला प्राइड ऑफ इंडिया, सरस्वती पुरस्कार आणि सिन्नर गौरव असे काही पुरस्कार देखील मिळाले आहेत. गारगोटी म्युझियम हे भारतातील एकमेव असे संग्रहालय आहे, ज्यात भारतातील व भारताबाहेरील ठिकाणांहून आणलेले, विविध आकार, रंग आणि भिन्न उपयोग असलेले खडक, खनिजे आणि स्फटिक यांचा खजिनाच आहे .




चित्र क्रमांक १ : गारगोटी संग्रहालयातील काही खनिजे

या संग्रहालयात आसपासच्या प्रदेशातील मूळ खनिजांच्या नमुन्यांचा संग्रह आहे. नाशिक, सिन्नर, पुणे या ठिकाणांहून मिळालेले दगड, तसेच भारतातील इतर ठिकाणांहुनच नाही तर परदेशातही मिळालेल्या उत्तमोत्तम आणि आकर्षक खनिजांचा आणि कापलेल्या दगडांचा संग्रह येथे आहे. संग्रहालयातील प्रदर्शनांमध्ये हिरे, कापलेले दगड, हलका हिरवा ऍपोफिलाइट, पिवळ्या कॅल्साइटचे स्फटिक, निळा-हिरवा एक्वामेरीन, कॅव्हनसाइट आणि दुर्मिळ विदेशी खनिजांचा समावेश आहे. पहिल्या मजल्यावर असलेल्या 'दख्खनच्या पठारावरील खनिजे' आणि तळमजल्यावर 'द प्रेस्टीज गॅलरी' या दोन गॅलरींमध्ये ते प्रदर्शित केले आहेत.

या संग्रहालयाचे शुल्क माणशी रु. १००/- इतके असून आपल्याला येथे योग्य ते मार्गदर्शन देखील मिळते. त्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी देखील मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत.

# सिन्नर जवळील महत्त्वाचे किल्ले

नाशिक जिल्ह्यात अनेक महत्त्वाचे किल्ले आहेत. कळसुबाई हे महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर आणि साल्हेर हा महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला हे देखील नाशिक जिल्ह्यातीलच. यातीलच दोन महत्त्वाचे किल्ले म्हणजे विश्रामगड अथवा पट्टा आणि रामसेज चा किल्ला.

पट्टा या किल्ल्यावर शिवाजी महाराजांनी मोहिमांच्या धामधुमीत मुक्काम केला होता म्हणून या गडाला विश्रामगड हे नाव पडले.

रामशेज किल्ला हा नाशिक शहराच्या उत्तरला १४ कि.मी. अंतरावर आहे. नाशिकजवळच्या दिंडोरी पासून हा १० मैलाच्या अंतरावर आहे. हा किल्ला मराठ्यांनी साडेसहा वर्ष मुघलांविरुद्ध लढवला होता. ह्या किल्ल्याबद्दल अशी आख्यायिका सांगतली जाते की येथे श्रीराम जेव्हा श्रीलंकेकडे जात होते तेव्हा येथे त्यांनी काही काळ वास्तव्य केले होते. श्रीराम या किल्ल्यावर विश्रांतीला जायचे, आणि तिथे त्यांची शेज आहे म्हणून या किल्ल्याला रामशेज असे नाव पडले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर औरंगजेबाने महाराष्ट्र जिंकायचा चंग बांधला होता. मोठ्या सैन्यबळानिशी तो इ.स. १६८२ला महाराष्ट्रावर चाल करून आला. आपल्या शहाबुद्दीन फिरोजजंग ह्या सरदाराला त्याने नाशिक प्रांतातील किल्ले काबीज करायची आज्ञा दिली. फिरोजजंगाने रामशेजपासून सुरुवात केली. पण तब्बल साडेसहा वर्षे हा किल्ला मराठ्यांनी लढवत ठेवला होता. आणि रामशेज शेवटपर्यंत अजिंक्य राहिला.

सिन्नर येथून २५ किलोमीटर पश्चिमेस असलेले औंढेवाडी येथे शिवकालीन औंढा किल्ला प्रसिद्ध आहे

तसेच जवळच देवपुर गावात प्रसिद्ध राणेखान वाडा आहे आणि संत बाबा भागवत महाराज संजीवन समाधी आहे. या मंदिराची व्यवस्था ह.भ.प रामायणाचार्य प्रसाद महाराज भागवत आणि ह.भ.प.धर्माचार्य दिगंबर महाराज भागवत हे पाहतात.

# सिन्नरमधील प्रसिद्ध उद्योग

विडी निर्मिती हा सिन्नर मधील प्रसिद्ध उद्योग असून "सिन्नर विडी उद्योग लिमिटेड" या नावाची कंपनी देखील मुंबई शेअर बाजारात वर्गीकृत केली आहे.

सिन्नर येथे औद्योगिक वसाहत देखील असून येथे इतरही लघुउद्योग चालतात.

# गोंदेश्वराच्या परिसरात

सिन्नर शहराच्या बस स्थानकाच्या २ किमीच्या परिसरातच हे गोंदेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिर परिसराच्या जवळच **गोंदेश्वर तलाव** देखील आहे. शक्यता अशी आहे कि या मंदिराच्या निर्माणासाठी लागणारा दगड याच ठिकाणाहून काढला गेल्यामुळे हा तलाव निर्माण झाला असावा.

वस्तुतः दाट लोकवस्ती असलेला हा परिसर. पण मंदिराचा परिसर मात्र अजूनही मोकळा आहे. सध्या या मंदिराला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत असल्याने या परिसरात सोयी सुविधा निर्माण करण्याचे कार्य सुरु आहे. मंदिराकडे जायचे असेल तर स्वतःचे वाहन हवे अथवा सिन्नरच्या बस स्थानकापासून रिक्षा करून तेथे पोहोचावे लागते. पण त्याचबरोबर जर आपल्याला स्थानकाकडे अथवा हॉटेल वर परत जायचे असेल तर एखाद्या रिक्षा चालकाचा क्रमांक बरोबर असला तर उत्तम अथवा बाजारापर्यंत सुमारे ५०० मीटर चालत यावे लागेल व तेथे एखादे वाहन मिळण्याची शक्यता आहे.

# प्रकरण ३: सिन्नर परिसराचा इतिहास

(https://nashik.gov.in/about-district/history/)

इसवी सनाच्या १२व्या शतकाच्या शेवटच्या त्रिदशकात देवगिरीचे यादव प्रसिध्द झाले. ते पूर्वी कल्याणीच्या चालुक्यांचे सरंजामदार म्हणून सेनदेशावर (खानदेश) राज्य करत होते. घराण्याचा संस्थापक सुबाहूचा मुलगा द्रिधप्रहार होता. व्रतखंडात सांगितल्याप्रमाणे त्याची राजधानी श्रीनगर ही होती, तर सुरुवातीच्या शिलालेखावरून असे दिसते की ते चंद्रादित्यपुरा आहे, ज्याची ओळख नाशिक जिल्ह्यातील आधुनिक चांदोरशी आहे. त्याचा मुलगा आणि उत्तराधिकारी सेयुनचंद्र होता, ज्यांच्यावर राज्य केले ते देश सेउनादेश म्हणून ओळखले जाऊ लागले. हे आधुनिक खानदेशाशी सुसंगत आहे. त्यात नाशिकपासून देवगिरीपर्यंत पसरलेल्या देशाचा समावेश होता.

राजा सेयुनचंद्र याने सेनपूर/सिंडिनेर (सिन्नर) नावाचे शहर वसवले. नाशिकजवळील अंजनेरी येथे सापडलेल्या शिलालेखावरून असे दिसते की अंजनेरी येथे यादव घराण्याची एक छोटीशी शाखा होती. या शाखेच्या सेणदेवाने एका जैन मंदिराला काही अनुदान दिले. सेउनादेव स्वतःला महासमंत म्हणवतात आणि ते मुख्य शाखेवर अवलंबून होते. या घराण्याने एका छोट्या जिल्ह्यावर राज्य केले ज्यात अंजनेरी हे प्रमुख शहर होते. यादव घराण्यात अनेक उल्लेखनीय राज्यकर्ते होते.

१२९४ मध्ये अलाउद्दीन खिलजीने रामचंद्रांच्या राज्यावर आक्रमण केले आणि अचानक देवगिरीच्या वेशीसमोर हजर झाले. रामचंद्रला नकळत नेण्यात आले आणि ते जास्त वेळ थांबू शकले नाहीत. त्याला मुस्लिम विजेत्याला मोठी खंडणी द्यावी लागली. तथापि, त्याने किमान १३१० पर्यंत राज्य केले; १३११ मध्ये काही काळ त्याचा मुलगा शंकरदेव हा त्याच्यानंतर गादीवर आला. त्यांनी दिल्लीला निर्धारित खंडणी पाठवणे बंद केले. त्यानंतर मलिक काफूरने त्याचा पराभव केला आणि त्याचा वध केला.

त्यानंतर काही काळानंतर, रामचंद्राचा जावई हरपालदेव याने बंड करून मुसलमानांना हुसकावून लावले, परंतु त्याचे यश अल्पकाळ टिकले. १३१८ मध्ये देवगिरीचे हिंदू राज्य संपुष्टात आले. त्यांच्याच कारकिर्दीत या शैलीत बांधलेली मंदिरे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आढळतात. यादवांच्या काळात मराठी साहित्याचीही भरभराट झाली.

याच काळात महानुभाव पंथाचा प्रसार करणाऱ्या चक्रधरांनी आपल्या धार्मिक शिकवणीचे माध्यम म्हणून मराठीचा वापर केला. त्यांना अनुसरून त्यांच्या अनेक अनुयायांनी मराठीत साहित्यकृती रचल्या.

यानंतरच्या काळातील या परिसरातील महत्त्वाच्या घडामोडींचा आढावा आपल्याला थोडक्यात घेता येईल तो असा -

- मराठा काळ: औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत म्हणजेच १७०७ पर्यंत नाशिक क्षेत्र मुघलांच्या ताब्यात होते.
- १७०७ नंतर नाशिकचा परिसर पूर्णपणे मराठा साम्राज्याखाली आला.
- सरदार नारोशंकर राजे बहादर यांनी रामेश्वराचे मंदिर बांधले आणि तेथे नारोशंकरची घंटा टांगली.
- कपालेश्वर मंदिर १७३८ मध्ये बांधले गेले.
- १७५१ मध्ये निजामाच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी शहराला नाशिक हे नाव वापरण्यास सुरुवात केली. निजामाच्या राजवटीत याला 'गुलशनाबाद' म्हणत. १७६०-६१ मध्ये 'सलाबत जंग'च्या पराभवानंतर नाशिक हे पेशव्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर होते.

- १७५१ च्या सुमारास निजामाच्या तिसऱ्या मुलाने सत्ता हाती घेतली आणि फ्रेंच लोकांच्या मदतीने औरंगाबादहून मराठ्यांवर हल्ला केला. परंतु मराठे त्याला भारी पडले आणि या निजामाने त्यांच्याशी तह केला आणि १७५२ चे युद्ध रद्द झाले. या तहानुसार गोदावरी आणि तापी नदी दरम्यानचा सर्व खानदेश मराठ्यांच्या अधिपत्याखाली आला.
- सरदार चंद्रचूड यांनी १७५६ मध्ये सुंदर नारायण मंदिर बांधले.
- सरदार आडेकर यांनी १७९० मध्ये काळाराम मंदिराची पुनर्बांधणी केली.
- १८१८ पर्यंत या भागावर पेशव्यांची सत्ता होती. १८१८ मध्ये थॉमस हायस्लो आणि ब्रिटीश सैन्याने कोपरगाव आणि चांदवडच्या उत्तरेकडील भाग जिंकून घेतला.
- त्यांनी खान्देश भागातून थाळनेर, ७ मार्च १८१८ रोजी चांदवड किल्ला जिंकला. मार्च १८१८ च्या अखेरीस, होळकरांशी युद्ध करून ब्रिटीश सैन्याने संपूर्ण नाशिकचा परिसर जिंकला.

# गोंदेश्वर मंदिराच्या निर्मितीचा इतिहासकालीन संदर्भ

इसवी सन १०२५ च्या सुमारास येथे यादव राज्य असल्याचे संदर्भ मिळतात. यावेळी येथे यादवकुळातील महासामन्त भिल्लम्म (तृतीय) हा राज्य करत होता (Cousens, 1931, ३६). सुरवातीला राष्ट्रकूट राजांच्या मांडलिकत्त्वाखाली असलेले यादव राजे पुढे बदामीच्या चालुक्यांच्या मांडलिकत्वाखाली गेले. त्यामुळेच या परिसरात मराठीबरोबर कानडी शिलालेख देखील आढळून येतात. त्यांची राजधानी सिंदीनगर/ सिंधनगर येथे असल्याचे दाखले मिळतात. पुढे याच जागी **सेऊनचंद्र (प्रथम)** याने त्याची राजधानी सेऊनपुर अथवा स्कुनपूर या नावाने प्रस्थापित केली. त्याचा मुलगा धाडियप्पा याचा पुढे याच परिसरात जन्म झाल्याचीही माहिती मिळते.

या यादव राजवंशाचे योग्य नाव मात्र सेउना किंवा सेवुना आहे. या राजवंशाचे शिलालेख, तसेच समकालीन राज्ये आणि साम्राज्ये, होयसळ, काकतीय आणि पाश्चात्य चालुक्य त्यांना सेउना म्हणतात.हे नाव त्यांच्या याच **सेऊनचंद्र** याच्या नावावरून पडले असावे.

गोंदेश्वराचे मंदिर यादव (गवळी) घराण्यातील एक राजा राव गोविंद याने दोन लक्ष रुपये खर्चून उभारल्याचे नोंद मिळते. १२ व्या शतकाच्या सुरवातीस असलेल्या गोविंदराजाच्या नावावरून या मंदिराचे नाव गोंदेश्वर पडले असावे अशी शक्यता या मंदिराच्या नावाबाबत वर्तविली जाते. पुढे १२व्या शतकाच्या मध्यावर, चालुक्यांची शक्ती कमी होत असताना, यादव राजा भिल्लम (पाचवा) याने स्वातंत्र्य घोषित केले. याचवेळी यादवांनी त्यांची राजधानी देखील देवगिरीला हलविली.

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी यांनी ज्यावेळी सिन्नर येथे भेट देऊन वास्तव्य केले तेव्हा येथे यादवांची राजवट होती. यादव भिल्लम राजांच्या नावाने येथील मठाचे नाव भिल्लम मठ असे पडले. हा मठ आजही ऐंणार येथे कार्यरत आहे. येथे चक्रधर स्वामींनी दहा महिने वास्तव्य केल्याची नोंद महानुभाव साहित्यात आहे. महदम्बा महदाईसा यांनी लिळा चरित्राचे लिखाण केले त्याचा आरंभ याच मठात केल्याचे सांगितले जाते.

पुढे **सिंहण (द्वितीय)** याच्या कारकिर्दीत यादव साम्राज्य त्यांच्या शिखरावर पोहोचले, आणि १३ व्या शतकाच्या अखेरपर्यंत त्यांची भरभराट झाली, पण १२९६ पासून अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणांना सुरुवात झाली, सुरुवातीच्या काळात यादवांनी त्याचा प्रतिकार केला पण १४ व्या शतकाच्या सुरवातीलाच म्हणजे १३०८ मध्ये अलाउद्दीन खिलजीच्या आक्रमणानंतर यादवांचा पाडाव व्हायला सुरुवात झाली.

रामचंद्राचा उत्तराधिकारी सिंहण तिसरा याने खिलजीच्या वर्चस्वाला आव्हान दिले, त्यामुळे त्याने १३१३ मध्ये मलिक काफूरला देवगिरीवर कब्जा करण्यासाठी पाठवले. त्यानंतरच्या युद्धात सिंहण तिसरा मारला गेला आणि खिलजीच्या सैन्याने देवगिरीचा ताबा घेतला. हे राज्य १३१७ मध्ये खिलजी सल्तनतीने ताब्यात घेतले. पुढे दिल्ली सल्तनतच्या तुघलक राजघराण्यातील मुहम्मद तुघलक याने या शहराचे देवगिरी हे नाव बदलून दौलताबाद केले.

देवगिरीचा आणि यादव साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतरदेखील यादवांच्या वंशाचे जे उरलेसुरले अस्तित्त्व होते ते आपल्याला याच सिन्नर प्रदेशात आढळून येते. यादवांचे त्यानंतरचे ताम्रपट, शिलालेख याच परिसरात आढळून येतात. याचबरोबर यादवांची नाणी देखील याच परिसरात आढळून येतात.

## यादव राजांचा पंथ

यादवांच्या वंशावळीचा विचार करता हे राजे प्रामुख्याने **शैवपंथीय** असल्याचे आढळून येते. त्यामुळेच या परिसरात गोंदेश्वर मंदिराबरोबरच आळेश्वर मंदिर (हे सध्या ऐश्वर्येश्वर मंदिर या नावाने देखील ओळखले जाते), मुक्तेश्वर मंदिर अशी प्राचीन मंदिरे देखील आढळतात. पैकी आळेश्वर मंदिरावर तर चालुक्य शैलीची छाप आढळते व ते या शैलीतील सर्वाधिक उत्तरेकडील मंदिर मानले जाते. (Cousens, 1931, 40). सिंहण प्रथम याने जैन धर्माचा अंगीकार केला होता. यामुळेच आपल्याला सिन्नर परिसरातील अंकाई टंकाईची लेणी, चामार लेणी तर देवगिरीच्या परिसरातही जैन लेणी आढळतात. थोडीशी इतिहासाकडे नजर टाकली तर यादवांच्या वंशावळीत काही राजांनी जैन धर्माचा अंगीकार केल्याचे लक्षात येते.

## सेऊन / यादव राजवंशाचे मूळ

यादव राजे स्वतःला द्वारकेशी अथवा यदु कुळाशी जोडत असले तरी कोणताही ऐतिहासिक पुरावा त्यांचा यदुवंशाशी अथवा द्वारकेशी असणाऱ्या कोणत्याही संबंधांकडे अंगुलीनिर्देशही करीत नाही. तसेच या राजवंशाने द्वारका जिंकण्याचा किंवा त्या प्रदेशाशी कोणताही राजकीय किंवा सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. राजनैतिकदृष्ट्या स्थापित झाल्यानंतरचा येथील राज्यकर्ते, साधारणपणे **सिंहण दुसरा** याच्या कालावधीपासून, स्वतःला यदूचे वंशज आणि द्वारकेचा स्थलांतरित असल्याचा दावा (**द्वारकापूर्वराधिश्वर**) करू लागले. द्वारका नागरी ही यदूच्या वंशजांशी संबंधित, आणि म्हणूनच त्या शहराशी संबंध असल्याचा राजवंशाचा दावा त्यांच्या वास्तविक भौगोलिक उत्पत्तीऐवजी, यदूपासून वंशज असल्याचा दावा केल्यामुळे असू शकतो. दक्षिणेकडील होयसळांनी देखील त्याचप्रमाणे यदुचे वंशज असल्याचा आणि द्वारकाचे पूर्वीचे स्वामी असल्याचा दावा केलेला आपल्याला आढळतो.

**सिंहण दुसरा** याच्याच कारकिर्दीत त्याने गुजरातवर आक्रमण केले व सोळंकी राजांचा पराभव केला. याच सुमारास त्यांनी तेथील स्थपती आपल्यासोबत आणले असावेत, ज्यांचा मोठा परिणाम नंतर महाराष्ट्रातील स्थापत्यकलेवर पडू लागल्याचे दिसते. याचमुळे हे मंदिर १३व्या शतकाच्या मध्यावर म्हणजे सिंहण (द्वितीय) याच्या कारकिर्दीत बांधले गेले असावे असा एक मतप्रवाह विद्वानांमध्ये आढळतो.

सध्याच्या महाराष्ट्राची मराठी भाषा ही, १४ व्या शतकात राजवंशाच्या शिलालेखांमध्ये मुख्यत्त्वकरून दिसू लागली. त्यापूर्वी कन्नड आणि संस्कृत ही त्यांच्या शिलालेखांची प्राथमिक भाषा होती. सुमारे दोनशे यादव शिलालेखांमध्ये मराठी दिसते, परंतु सामान्यतः कन्नड आणि संस्कृत मजकुराचे भाषांतर किंवा जोड म्हणून. राजवंशाच्या राजवटीच्या शेवटच्या अर्ध्या शतकात, ती अक्षरलेखनाची प्रबळ भाषा बनली. याचे मुख्य कारण म्हणजे यादवांनी त्यांच्या मराठी भाषिक सरदार आणि प्रजेशी जोडण्याचा आणि कन्नड भाषिक होयसलांपासून स्वतःला वेगळे करण्याचा प्रयत्न हे असण्याची दाट शक्यता आहे.

शिलालेखांचे पुरावे असे सूचित करतात की यादव राजवंश मुलाच्या एखाद्या कन्नड भाषिक पार्श्वभूमीतून उदयास आला होता. सुमारे पाचशे यादव शिलालेख असे सापडले आहेत कि ज्यात कन्नड ही या शिलालेखांची भाषा आहे, त्यानंतर संस्कृत आहे.सध्याच्या कर्नाटकात सापडलेल्या शिलालेखांपैकी (सर्वात जुने भिल्लमा द्वितीय, च्या शासनकाळातील) बहुतेक कन्नड भाषा आणि लिपीत आहेत; इतर कन्नड भाषेत आहेत परंतु देवनागरी लिपी वापरतात.

या राजवंशातील अनेक राज्यकर्त्यांना कन्नड नावे आणि पदव्या होत्या जसे की "धडियाप्पा", "भिल्लमा", "राजुगी", "वदुगी" आणि "वासुगी", आणि "कालिया बल्लाळ". काही राजांना "सिम्हण" (किंवा "सिंघण") आणि "मल्लुगी" सारखी नावे होती, जी नंतरच्या काळात कर्नाटकात राज्य करणाऱ्या कल्याणीच्या कलचुरींनी देखील वापरली होती. तत्कालीन नोंदी असे दाखवतात की सुरुवातीच्या शासकांपैकी एक, सेउनचंद्र द्वितीय , याला सेल्लाविडेगा ही कन्नड पदवी होती. राज्यकर्त्यांचे त्यांच्या संपूर्ण शासनकाळात, कन्नड भाषिक राजघराण्यांशी अत्यंत घनिष्ठ वैवाहिक संबंध होते. भिल्लमा द्वितीय हिचा विवाह लच्छियाववे यांच्याशी झाला होता, जो कर्नाटकातील राष्ट्रकूट वंशज कुटुंबातील होता. वड्डिगाचा विवाह राष्ट्रकूट सरदार धोरप्पा यांची कन्या वद्दियाववेशी झाला होता. वेसुगी आणि भिल्लम तृतीयच्या बायका चालुक्य राजकन्या होत्या.

# प्रकरण ४: मंदिर स्थापत्य

मंदिरांचे स्थापत्य हा एक गहन विषय आहे. भारतभरात पसरलेल्या मंदिरांच्या अनेक शैली आहेत जसे नागर शैली, वासर शैली, द्रविड शैली आदी. महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये काही शैलींचा संगम देखील आढळून येतो. सर्वसाधारण बोलीभाषेत एखाद्या जुन्या मंदिराला हेमाडपंती असे म्हणण्याचा प्रघात असला तरी या नावाची कोणतीही मंदिर स्थापत्य शैली अस्तित्वात नाही हे आपण ध्यानात ठेवायला हवे.

मंदिराची स्थापत्य शैली त्या परिसरात उपलब्ध असलेले दगड, तेथील मुख्य स्थपतीचे कौशल्य आणि उपलब्ध कारागीर, मंदिराच्या बांधकामाचा कालावधी (कोणत्या शतकात बांधले गेले) आणि मंदिर बांधायला लागलेला एकूण काळ, त्या मंदिरबांधणीच्या वेळी त्या ठिकाणी असलेली प्रबळ आणि स्थिर राजसत्ता, राजाचा पंथप्रभाव (शैव, वैष्णव, शकत, जैन आदी), त्या मंदिराचे मुख्य दैवत अशा अनेक गोष्टींवर अवलंबून असतो.

लोकसंख्येच्या वाढीबरोबर तीर्थस्थळे वाढीस लागली आणि राजसत्तांमध्ये देखील उत्तमोत्तम मंदिरे बांधण्याची चढाओढ सुरु झाली. इ.स. च्या ५ व्या शतकापासून महाराष्ट्रात मंदिरांचे बांधकाम सुरु झालेले आढळते. नागपूरच्या रामटेक या ठिकाणी असलेली केवल नृसिंह व उग्र नृसिंह ही महाराष्ट्रातील सुरुवातीच्या काळातील मंदिरे. ही अगदी प्राथमिक स्वरूपाची आहेत. पुढे ८ व्या शतकानंतर अनेक मंदिरांचे बांधकाम झालेले आढळते. यादवांच्या सत्तेमध्ये महाराष्ट्राचा बराच उत्कर्ष झाला आणि त्या कालावधीत अनेक उत्तमोत्तम मंदिरे बांधली गेली. नाशिकचे गोंदेश्वर मंदिर हे अशाच मंदिरांपैकी एक आहे. याचे अंबरनाथ येथील अमरेश्वर मंदिराशी बरेचसे साधर्म्य आहे. पण अंबरनाथचे शिवमंदिर हे याच्या बरेच आधी बांधले गेले आहे अशी माहिती आपल्याला ऐतिहासिक संदर्भातून मिळते. गोंदेश्वर मंदिर हे अंबरनाथच्या मंदिराची विकसित आवृत्ती असली तरी बाह्यभागांवरील कथांचे अंकन पाहता अंबरनाथचे मंदिर सरस ठरते यात शंकाच नाही.


असे असले तरी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर जवळ असलेले गोंदेश्वर मंदिर हे एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण व एकमेवाद्वितीय मंदिर आहे.

## गोंदेश्वर मंदिराची रचना

आदि शंकराचार्यांना अभिप्रेत असणाऱ्या पंचायतन प्रकारात वर्गीकृत असणारे हे मंदिर महाराष्ट्रातील एकमेव सुस्थितीतील पंचायतन मंदिर आहे. **भूमिज - नागर अशा मिश्र शैलीत हे मंदिर बांधलेले आहे.** मुख्य मंदिर भूमिज शैलीत असून पंचायतनाच्या ४ मंदिरे नागर शैलीतील आहेत. "गोंदेश्वर शिव" केंद्रस्थानी असणाऱ्या या मंदिरात बाजूला ही छोट्या आकाराची नागर शैलीतील विष्णू, गणपती, सूर्य आणि शक्ती मंदिरे आहेत. मंदिराच्या गाभाऱ्याच्या अगदी समोर परंपरेनुसार शिवलिंगांकडे पाहात असलेल्या नंदीचा मंडप आहे. आणि ही पंचमंदिरे आणि नंदी मंडप एक मोठ्या उंच जोत्यावर (**जगती**) आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराला पूर्व आणि दक्षिण दिशांनी प्रवेशावर असून त्यापैकी पूर्वेकडचे प्रवेशद्वार सध्या बंदच ठेवण्यात आलेले आहे पण या प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर असलेल्या मंडपाला संपूर्ण वर्तुळाकार उघडे छत असलेला स्वर्गमंडप आहे. आणि त्यासमोर मग हा नंदीमंडप आणि पंचायतन मंदिर असलेला चौथरा (**जगती**) येतो.




चित्र क्रमांक २ : मंदिराचा आराखडा (गूगल वरून)



चित्र क्रमांक ३ : मंदिराचा आराखडा (Cousens, 1931,144,145)

गोंदेश्वर मंदिर हे एका आयताकृती तटबंदीमधे एका चौथऱ्यावर बांधलेले आहे. या तटबंदीची उत्तर-दक्षिण अशी रुंदी २८४ फूट असून पूर्व पश्चिम लांबी ३१४ फूट आहे. (Burges, 1910, 144). याचे जोते (जे जगती या नावाने ओळखले जाते) १२४ फूट लांब व ९४ फूट रुंद आहे. **मंदिराचा मुख्य मंडप** सुमारे २१ फूट ९ इंच लांबी रुंदी असलेला चौरस असून मधल्या ४ खांबांवर तोलून धरलेला आहे **(Burges, 1910, १४५)** व बाह्य खांबांच्या आधारासह हा सुमारे १९ फूट उंच तोलून धरलेला आहे.



चित्र क्रमांक ४ : गोंदेश्वर मंदिराचे १८९७ सालचे छायाचित्र.

यावर असलेला मंदिराचा कळस पुढे झालेल्या तडिताघातात पडला व म्हणून सध्याचे मंदिर कळसरहित आहे.

(Image Credits : By Unknown author - Leiden University Library, KITLV, image 88234 Collection page Southeast Asian & Caribbean Images (KITLV), Public Domain,
https://commons.wikimedia.org/w/index.php?curid=39955964)

Also (Burges 1910, १४४ ) (Facing Photograph)


## गोंदेश्वर मंदिर शैली

सिन्नरच्या या गोंदेश्वर पंचायतन मंदिरापैकी मुख्य शिवमंदिराची रचना अंबरनाथ येथील **भूमिज** शैलीतील शिव मंदिराशी मिळतीजुळती आहे पण या मंदिरावरील कोरलेल्या मूर्ती अंबरनाथ मंदिराएवढ्या आकर्षक नाहीत (Cousens 1931, ३६,३७ ) गोंदेश्वर मंदिराच्या विविध भागात ज्या कथा कोरलेल्या आहेत त्यांची पॅनेल्स देखील लहान लहान आहेत. मंदिर मंडपाच्या मुख्य खांबावर थोड्या मोठ्या मुर्त्या आढळतात पण बाह्यभागावर मात्र त्या फारशा आढळत नाहीत.

भारतीय मंदिर स्थापत्यकलेचे तीन प्रमुख प्रकार ऐतिहासिक ग्रंथांमध्ये आढळतात, हे आहेत नागर, वेसर, आणि द्रविड. यात थोड्याफार सुधारणा होत पुढे भूमिज, कलिंग अशाही शैली अस्तित्वात आल्या. उत्तरेकडील भागात आपल्याला नागर शैलीची मंदिरे आढळतात, विंध्याच्या दक्षिणेकडील आणि गुजरात, माळवा (मध्य प्रदेश), राजस्थान व महाराष्ट्र या प्रदेशात भूमिज शैली आढळून येत. कर्नाटकच्या भागात वेसर शैलीची मंदिरे आढळतात. वेसर शैली आपल्याला "प्रारंभिक चालुक्य" किंवा "बदामी चालुक्य", किंवा "कल्याण" किंवा "पश्चिम चालुक्य शिल्प मंदिरातून आणि "होयसला शिल्पमंदिरांतून", पाहायला मिळते. तर कर्नाटकाच्या खाली दक्षिणेकडील भागात द्रविड शैलीची मंदिरे आढळतात.

## भूमिज शैली


भूमिज हा संस्कृत शब्द आहे ज्याचा अर्थ "भूमी अथवा जमिनीपासून" असा होतो. स्थापत्यशास्त्राच्या संदर्भात, भूमिज शैलीची चर्चा **समरांगण सूत्रधार** या ग्रंथाच्या अध्याय ६५ मध्ये केली गेली आहे. (जोगे २०२४ )



344. Cross-section of Gondesvara Temple at Sinnar.
Scale 20 ft. to 1 in.

चित्र क्रमांक ५ : गोंदेश्वर येथील भूमिज मंदिराचा आराखडा

भूमीज ही उत्तर-पश्चिम भारतीय मंदिर वास्तुशिल्पाची एक शैली आहे. यात गर्भगृहाच्या शिखरावर शिखर बांधण्यासाठी चौरस-वर्तुळ तत्त्व लागू केले जाते. परमार राजवंशाच्या काळात मध्य भारतातील माळवा प्रदेशात (पश्चिम मध्य प्रदेश आणि आग्नेय राजस्थान) १० व्या शतकात या शैलीचा उगम झाला असावा असे मानण्यात येते. हि शैली १०व्या शतकानंतरच्या हिंदू आणि जैन मंदिरांमध्ये आढळते. सर्वात सुरुवातीची आणि मोहक उदाहरणे मालवा प्रदेशात आणि आसपास आढळतात, परंतु ही रचना गुजरात, राजस्थान, दख्खन (महाराष्ट्र) आणि दक्षिण आणि पूर्व भारतातील काही प्रमुख हिंदू मंदिर संकुलांमध्ये आढळतात.



चित्र क्रमांक ६ : भूमिज मंदिराचा पाया (विकिपीडिया वरून)

भूमिज शैलीचे वैशिष्ट्य म्हणजे एक चौरस योजना आहे जी त्याच्या केंद्राभोवती वर्तुळाकार मार्गाने फिरते आणि हे भ्रमण नियमित अंतराने करत शिखर वर वर चढविले जाते. भ्रमण ज्या अंतराने थांबवले जाते ते नियोजित करून, अनेक सर्जनशील भिन्नता तयार केल्या जाऊ शकतात. अशा प्रत्येक स्तराला भूमी म्हणतात. यातून भद्र तयार करून त्यात आकर्षकता आणली जाते. या भद्रांमध्ये वर्तुळाकार गवाक्षे केली जातात. मंदिर प्रवेशद्वारावर असणाऱ्या अशा वर्तुळाकार गवाक्षाला **शुकनास** तर मंदिराच्या इतर बाजूच्या भद्रांच्या खाली असणाऱ्या गवाक्षांना **शूरसेनक** असे म्हणतात.

या आधी वर्णन केल्याप्रमाणे हे भूमिज शैलीतील मुख्य मंदिर असून सभोवतालची पंचायतनाची ४ मंदिरे नागर शैलीतील आहेत. मुख्य मंदिराला **५ कर्ण** असून त्याच्या शिखरावर ७ छोटी शिखरे आहेत त्यामुळे हे मंदिर **सप्तभूम** प्रकारात मोडते. नागर शैलीचा भाग असलेली शुकनासिका आपल्याला या मंदिराच्या उत्तर व दक्षिण बाजूस पाहायला मिळते. मुख्य सभामंडपाला उत्तर व दक्षिण दिशेने दोन अर्धमंडप असून पूर्व प्रवेशद्वाराजवळ एक मुखमंडप आहे.

## मंदिर प्राकाराचे पूर्व प्रवेशद्वार

सध्या मंदिराचे दक्षिणेकडील एकाच प्रवेशद्वार वापरात असले तरी या मंदिराचे आधीचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेकडूनच होते असे दिसते कारण या द्वारापाशी आता शिरल्यावर एक उत्कृष्ट वर्तुळाकार स्वर्गमंडप आहे. याची तुलना आपल्याला खिद्रापूरच्या कोपेश्वर मंदिराच्या स्वर्गमंडपाशी करता येईल, पण ती त्याच्या वर्तुळाकार छताच्या आकाराशीच मर्यादित असेल. हे प्रवेशद्वार आणि हा स्वर्गमंडप आता भंगलेल्या अवस्थेत असल्याने हे द्वार बंदच ठेवण्यात येते.



चित्र क्रमांक ७ : मंदिर प्राकाराचे पूर्व प्रवेशद्वार

चित्र क्रमांक ८ : वर्तुळाकार स्वर्गमंडप



पंचायतन मंदिरासंबंधी आपल्याला एक श्लोक पाहायला मिळतो तो असा

**शंभो: सूर्यो गणेशश्च चण्डी विष्णु प्रदक्षिणे: |**
**स्थाप्या: सर्वे शिवस्थाने दृष्टिवेधववार्जिता ||**

## पंचायतन मंदिरे

या श्लोकाप्रमाणे शिवमंदिराच्या सभोवताली सूर्य, गणेश, चण्डी (देवी) व विष्णु अशा क्रमाने मंदिरे असायला हवीत. अशाच प्रकारच्या नोंदी आपल्याला कझिन्सच्या निरीक्षणात पाहायला मिळतात म्हणजेच त्याने आग्नेयेला (दक्षिण-पूर्व) सूर्य मंदिर, नैऋत्येला गणेश मंदिर, वायव्येला देवी मंदिर व ईशान्येला विष्णू मंदिर आहे असे लिहिले आहे (Cousens 1931, ३९ ). परंतु आज मात्र आपल्याला सूर्य आणि विष्णू यांच्या स्थानांची अदलाबदल झालेली पाहायला मिळते. त्यामुळे याच सध्याच्या मुर्त्याच तिथे आधीपासून असाव्यात हे सांगणे अवघड आहे.

मंदिरातल्या मूर्तींची जरी जागा बदलता येत असली तरी त्याच्या बाह्यभागावरील मूर्ती, शिखरावरील मूर्ती तशाच राहतात. मंदिर अभ्यासक या मूर्तींच्या संकेताने कदाचित मंदिर ओळखूही शकत असावेत. नैऋत्येकडील मंदिरात गणपतीची मूर्ती आहे मात्र याच्या शुकनासिकेवर आपल्याला सूर्यमूर्ती आढळून येते. तर आग्नेयेकडील मंदिराच्या शुकनासिकेवर नरसिंहाची मूर्ती आढळते.

या पंचायतन मंदिरांपैकी महिषासुर मर्दिनी व गणेश मूर्ती मंदिरांतील पुढील छायाचित्रात दाखविल्या आहेत



चित्र क्रमांक ९ : महिषासुर मर्दिनी



चित्र क्रमांक १० : गणेश

# नंदी मंडप

मंदिराच्या आयताकृती जोत्यावर ४ कोपऱ्यांवर ४ देवांची मंदिरे असून पूर्वेकडच्या मंदिर प्रवेशद्वारापाशी नंदी मंडप आहे. याच्या बाह्यभागावर आणि अंतर्भागावर विविध मनुष्यकृती , विष्णूचे वराह आणि नृसिंह हे दोन अवतार व सुरसुंदरी कोरलेल्या आहेत तर आता बाजू आणि छतावरही नक्षीकाम केलेले आढळते. या असलेला नंदी मंदिराच्या मूळ मुर्त्यांपैकी नसावा तर नंतरच्या काळात, मूळ नंदीची तोडफोड झाल्यानंतर बसविला गेला असावा. **(Cousens, 1931, ३८,३९)**. याच्या शेजारीच आपल्याला २-३ नंदी तोडफोड झालेल्या अवस्थेत दिसतात.



चित्र क्रमांक ११ : नंदी मंडप – समोरून



चित्र क्रमांक १२ : नंदी मंडपाशेजारील तोंडलेले नंदी

## शिखरांचे प्रकार

मंदिराचे मुख्य शिखर आपण यापुढील भागात पाहणार आहोत. त्याव्यतिरिक्त या मंदिराच्या शिखरांची विभागणी आपल्याला प्रामुख्याने तीन प्रकारात करता येते. त्यातले (१ ) नंदीमंडपाचे शिखर फमसाना प्रकारातील आहे. (२) उपमंदिरांची शिखरे लतिन नागर शिखर शैलीची आहेत तर (३) मुख्य मंडपाचे शिखर संवरण प्रकारातील आहे. (Parul University 2016)



चित्र क्रमांक १३ : नंदीमंडपाचे शिखर फमसाना शैली



चित्र क्रमांक १४ : उपमंदिरांची शिखरे लतिन नागर शैली



चित्र क्रमांक १५ : नंदी मंडपातून मुख्य मंदिर: संवरण शिखर शैली

# प्रकरण ५: मंदिराचे मुख्य भाग

https://en.wikipedia.org/wiki/Hindu_temple_architecture

मंदिराच्या प्राकारात आपण प्रवेश करतो तेव्हा हे भव्य मंदिर आपल्याला अशा प्रकारे दृष्टीस पडते कि एखादा मोठा गजराजच अंबारीसह आपल्या पुढल्या उभा आहे. मंदिराच्या प्राकाराच्या बाजू आता सुस्थितीत आहे. प्रवेश केल्यावर आत डावीकडेच पुरातत्व विभागाने लावलेला एक माहितीफलक आपल्या दृष्टीस पडतो व या मंदिराची जुजबी माहिती आपल्याला मिळते.



चित्र क्रमांक १६ : प्राकाराचे दक्षिण प्रवेशद्वार




चित्र क्रमांक १७ : पुरातत्व विभागाचा माहितीफलक



चित्र क्रमांक १८ : अंबारीसह गजराजासम भासणारे गोंदेश्वर मंदिर

## जगती


जगती म्हणजे उंच अधिष्ठान सिन्नरच्या या गोंदेश्वर मंदिराला १२५ x ९५ फूट आकाराची जगती आहे त्यावर हे पंचायतन मंदिर रचलेले आहे. हि जगती सर्व पाचही मंदिरांचा भार सांभाळत उभी आहे असे म्हणता येईल . इंग्रजी मध्ये याला पाश्चात्य ग्रीको-रोमन शास्त्रीय वास्तुकलेतील आधार, प्लिंथ आणि सोकल या शब्दांनी संबोधले जाऊ शकते.

## अधिष्ठान व उपपीठ

मंदिराच्या सगळ्यात पायाशी असलेल्या थरशिळेपासून कपोतपाली पर्यंतचा भाग अधिष्ठान म्हणून ओळखला जातो. यात वेगवेगळ्या रचनांचे थर असतात. गोंदेश्वर मंदिरात आपल्याला मोठे हत्ती असलेला गजथर आढळून येतो. मात्र या सर्व हत्तींची तोडफोड झालेली असल्याने त्यांचे मूळ सौन्दर्य नष्ट झालेले आहे. हे संपूर्ण मंदिर हत्तींनी आपल्या पाठीवर तोलून धरले आहे असे दाखविणारी हि संकल्पना. अंबरनाथ येथील शिवमंदिरात आपल्याला गजथर आणि नरथर असे दोन थर देखील यात आढळतात. या नरथरांमध्ये तत्कालीन लोकजीवनाचे काही अंश दर्शविलेले असतात. तर काही मंदिरांमध्ये आपल्याला या दोन थरांसोबत अश्वथर देखील आढळतात. पहा चित्र क्रमांक 19: गोंदेश्वर मंदिर अधिष्ठानाचे रेखाचित्र

अधिष्ठानाचा हा गजथरापर्यंतचा भाग म्हणजे उप पीठ. या मंदिरात आपल्याला जाड्यकुंभ, कणिका , आंतरपट्टीका आणि कपोतपाली आणि गजथर असे जे भाग आढळतात ते चित्र क्रमांक १ मध्ये दाखविले आहेत. त्यावर अधिष्ठानाचा जो उर्वरित भाग आहे त्याच्या प्रगतीनुसार आपल्याला मंदिर शैली, आणि मंदिर कालावधी ठरविण्यास मदत होते. या मंदिराचा हा भाग माळवा आणि गुजरातेत विकसित झालेल्या मरू जर्जर शैलीचा प्रभाव आढळतो आणि त्यावरून आपल्याला या साम्राज्याचे एकमेकांशी असलेले संबंध, कलाकारांची देवाणघेवाण या गोष्टी लक्षात येतात.

कुंभ हा त्यापैकी एक महत्त्वाचा भाग. या मंदिरातील कुंभाची शैली विकसित आहे. हा कुंभ दोन भागात असून कुंभाच्या वरील भागात नक्षीदार रक्तपट्टिका आहे तर खालील भागाचा वापर विविध मूर्तींच्या अंकनासाठी केलेला आहे. यांना रथिका असे म्हणतात. अंबरनाथच्या मंदिरात जशी मोठी शिल्पे मंदिराच्या बाह्यभागात आहेत, तशी येथे नसली तरी शिल्पकाराने या रथिकांचा वापर शिल्पांसाठीं केलेला आहे.




चित्र क्रमांक १९ : गोंदेश्वर मंदिर अधिष्ठानाचे रेखाचित्र

## मंडोवर आणि जंघा

कुंभाच्या वरच्या भागात कलशाचे आयोजन आहे व त्यावर अधिष्ठानाच्या वरच्या बाजूची कपोतपाली येते. त्यानंतर मंदिराचे मंडोवर सुरु होते. याचा सर्वात मोठा भाग जंघा या नावाने ओळखला जातो. इतर मंदिरांमध्ये जंघा या भागावर मोठ्या मुर्त्यांची अंकन असते. येथे या जंघेतील भद्र असलेल्या ठिकाणी देवकोष्ठे आहेत पण दुर्दैवाने या देवकोष्ठांमधील मूर्ती अस्तित्वात नाहीत.




चित्र क्रमांक २० :गोंदेश्वर मंदिराचे मुख्य भाग दर्शविणारे रेखाचित्र

## गवाक्ष

गवाक्ष या शब्दाचा अर्थ होतो "बैल किंवा गाईचा डोळा" असा होतो. पण वापरातील अर्थ म्हणजे खिडकी. हिंदू मंदिरांमध्ये, त्यांची भूमिका प्रतिकात्मकपणे (Kanitkar, 2014) गर्भगृहातील मध्यवर्ती चिन्हाचा प्रकाश आणि वैभव पसरवणारी आहे. वैकल्पिकरित्या, त्यांचे वर्णन, देवतेला जगाकडे टक लावून पाहण्यासाठी असलेली एक खिडकी असा असतो. अशा बऱ्याच गवाक्षांचे अंकन मंदिराच्या बाह्य आणि अंतर्भागात आढळते आणि त्यात विविध देवतांची प्रतिष्ठापना देखील केली असते.

## भद्र

गर्भगृहाच्या बाहेरच्या बाजूने पाहिले असता पाठीमागे (पश्चिम दिशेकडील), दक्षिणेकडे व उत्तरेकडे दिसणारा सरळ भाग म्हणजे भद्र. हा मंदिराचा एक महत्त्वाचा भाग आहे कारण यातच देवकोष्ठे येतात ज्यात मुख्य देवतांच्या प्रतिमा येतात. याच्या शेजारीच दोन्ही बाजूला उपभद्र आहेत आणि या दोहोंच्या मधल्या भागात **सलीलांतर** हा पोकळीवजा भाग असतो ज्या द्वारे मंदिराच्या वरच्या बाजूने कोसळणारे पावसाचे पाणी येते एकत्र येत खाली उतरते व वाहात जाते. याच्या शेजारीच या मंदिराच्या गर्भगृहाच्या बाहेरील बाजूचे ५ कर्ण येतात.

समरांगण सूत्रधार ग्रंथात वर्णन केलेल्या भूमिज मंदिरांच्या चतुरस्त्र प्रकारातील "मलयाद्री" या उपप्रकाराला जुळणारे हे मंदिर आहे. मंदिराचा कालावधी ठरविण्यालाही यामुळे मदत होते.

मंदिराच्या पाठीमागील भागातून (पश्चिम बाजू) आपण जर खालून वर जर मंदिराकडे पाहिले आपल्याला अधिष्ठानाच्या वरील भागावर देवकोष्ठ आढळते व त्याच्याही वर या भूमिज मंदिराच्या शिखराचा भाग सुरु होतो. त्याच्या सुरवातीलाच म्हणजे खालच्या भागावर वर्तुळाकार पदकाच्या आकाराचे शूरसेनक आढळते, ज्यात आपल्याला नृत्यशिव आढळून येतो. हे शूरसेनक म्हणजे गवाक्ष या मंदिराच्या प्रतीकातूनच निर्मित भाग आहे. याच्या वरील भागात लतेचे नक्षीकाम आहे. हि आहे शिखरावरील मध्यलता.

## शुकनास

शुकनास किंवा सुकनासी हे गर्भगृहाच्या किंवा आतील मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावरील बाह्य सुशोभित वैशिष्ट्य असते. या मंदिराच्या शिखरावर देखील शुकनास आहे आणि त्यावरील गवाक्षावर आपल्याला शिवाच्या रूपांचे अंकन केलेले आढळते. शुकनास हा भाग नागर शैलीतून भूमिज शैलीत आला असे मानले जाते.

शुकनास या नावाचा अर्थ "पोपटाची चोच" असा आहे आणि मंदिराच्या विविध भागांमध्ये देवतेची शरीररचना दर्शविणारी समजून घेण्याचा भाग म्हणून, मंदिराच्या अधिरचनेचे "नाक" म्हणून याला संबोधले जाते. सुरुवातीच्या विविध ग्रंथांनी शुकासनाच्या आकाराचे प्रमाण, गोलाकार गवाक्षावर केंद्रीत केले आहे आणि त्याचा आकार मंदिराच्या बाकीच्या, विशेषतः शिखराच्या उंचीच्या प्रमाणात आहे.

## कापिली आणि अंतराळ

मंदिराचा मुख्य मंडप आणि गर्भगृह याना जोडणारा भाग म्हणजे अंतराळ. बाहेरच्या बाजूने याच भागाला कापिली असे नाव आहे. म्हणजेच बाहेरच्या बाजूने पाहिले असता भद्र आणि मुख्य मंडप यांना जोडणारा भाग म्हणजे कापिली. मंदिराची भव्य शुकनास याच भागावर येते. यात समोरील भागात वर्तुळाकार गवाक्ष तर उत्तर दक्षिण भागावर दोन पातळ्यांवर देवकोष्ठे आहेत आणि त्यावरही एक शुकनास आहे.

## शिखर

या मंदिराला ५ कर्ण आहेत हे आपण या आधीच पाहिले. याच कर्णांच्या वर आपल्याला छोट्या छोट्या शिखरांसारखी रचना कोरलेली असतात याना भूम असे म्हणतात. या मंदिरावर अशी सात शिखरे असल्याने याला **सप्तभूम शिखर** असे म्हणतात. काही लहान मंदिरे त्रिभुम, पंचभूम अशी देखील असतात तर उंच शिखरांना ९ किंवा ११ देखील असतात. शिखर भद्रावर (पश्चिम, दक्षिण व उत्तर बाजूकडील शिखराच्या भागांवर) खालच्या बाजूला वर्तुळाकार शूरसेनक असते हे आपण आधीच पाहिले आहे.मुख्य प्रवेशद्वाराच्या दिशेने जेव्हा हा गवाक्षासारखा भाग असतो तेव्हा तो आकाराने मोठा असते व **शुकनास** म्हणून ओळखले जातो.

## आमलक व कलश


आमलक - हा मंदिराच्या शिखरावर असलेला कमल पुष्पासारखा भाग. यावर मंदिराचा कलश बसविलेला असतो व त्यावर मंदिराचा ध्वज असतो. आमलक हे प्रातिनिधिक स्वरूपातील कमळ आहे. गोंदेश्वर मंदिराच्या शिखरावरील आमलक व कलश असलेला भाग तडिताघातामध्ये पडला. हा भाग आता आपल्याला खाली प्रवेशद्वारापाशी पाहायला मिळतो.




चित्र क्रमांक २० :गोंदेश्वर मंदिराच्या आमलक व कळसाचा भाग

# प्रकरण ६: मंदिराची अंतर्गत रचना

गोंदेश्वराचे मुख्य मंदिर अंबरनाथ मंदिराच्या धर्तीवरच बांधले गेलेले आहे हे आपण या आधीच पाहिले आहे. या प्रकारच्या मंदिरात आतील बाजूने गर्भगृह, अंतराळ (गर्भगृह व मुख्य मंडप यांना जोडणारा भाग) आणि मुख्य मंडप असे प्रमुख भाग पडतात. यातील मुख्य मंडपाला ३ प्रवेशद्वारे असून या प्रत्येक प्रवेशद्वारापाशी अर्धमंडपांची रचना केलेली आहे. पूर्वेकडचे प्रवेशद्वार जरी मुख्य प्रवेशद्वार मानले गेलेले असले तरी मंदिराच्या मुख्य आवाराचे पूर्व प्रवेशद्वार बंद केले गेले असल्याने मंदिरमंडपाचे पूर्व प्रवेशद्वार देखील दुय्यम स्थानी गेले आहे आणि आपला प्रवेशदेखील बरेचदा दक्षिण प्रवेशद्वारातून होतो.



चित्र क्रमांक २२ : मंदिराचा अंतर्भाग - मंडप - अंतराळ व गर्भगृह एकाच दृष्टीक्षेपात

## मुख्य मंडप

मंदिरात चार अंतर्गत स्तंभ असून ते भद्रक प्रकारातील आहेत. यांची उंची ९ फूट ६ इंच आहे **(Cousens, 1931, ३८)**. त्यांच्या खालचा चौकोन (स्तंभपाद) मंदिराच्या भद्र आणि कर्ण स्वरूपात कोरलेला आपल्याला दिसून येतो. या स्तंभपादाची रचना पण मंदिराच्या खालच्या भागाच्या रचनेशी मिळतीजुळती असते.



चित्र क्रमांक 23 : गोंदेश्वर मंदिरातील स्तंभ

← **स्तंभशीर्ष** - मंदिराचा मंडप तोलून धरणारा भाग

← **स्तंभमध्य** (यात बऱ्याच सुंदर मूर्त्यांचे अंकन आढळते पान येथे एकाच मोठी मूर्ती आहे. त्यावरच्या छोट्या पट्टिकेमध्ये जनजीवनाचे अथवा कथांचे अंकन आढळते)

स्तंभाचा मधला भाग म्हणजे **स्तंभमध्य** तर स्तंभाचा वरचा आणि छत तोलून धरणारा भाग म्हणजे **स्तंभशीर्ष** (जोगे २०२४ ). यापैकी स्तंभमध्यावर आकर्षक मूर्तींची रचना केलेली आढळते. पैकी खालच्या बाजूच्या मूर्ती आकाराने मोठ्या तर त्याच्या वरच्या बाजूंला छोट्या पॅनेल्स मध्ये काही कथांचे अंकन केलेले आढळते. या चारही स्तंभांवरील मुख्य शिल्पांची आणि शिल्पकथांची ओळख आपण पुढील भागात करून घेऊ.

← **स्तंभपाद** यात रथिका स्वरूपातील शिल्पांकन आहे.




चित्र क्रमांक २४ : गोंदेश्वर मंदिराचा सर्वसाधारण आराखडा



चित्र क्रमांक २५ : पश्चिम भद्र – मंदिराची मागची बाजू



चित्र क्रमांक २६ : उत्तर भद्र व मकरप्रणाल

# अंतराळ

मंदिराचे गर्भगृह आणि मुख्य मंडप यांना जोडणारा भाग म्हणजे अंतराळ. यालाच बाहेरील बाजूने कापिली असे म्हणतात. याच्याच अखेरीस गर्भगृहाचे मुख्य द्वार असते जे सुंदर द्वारशाखांनी अलंकृत केलेले असते. या मंदिरातील अंतराळात दोन्ही बाजूला देवकोष्ठ असून वरच्या बाजूला अतिशय सुंदर अलंकरण असलेले वर्तुळाकार नाभी वितान (छतावरील नक्षीकाम) आहे



चित्र क्रमांक २७ : अंतराळ – डावीकडील देवकोष्ठ



चित्र क्रमांक २८ : अंतराळ – उजवीकडील देवकोष्ठ

## मुख्य द्वारशाखा

या मंदिराची द्वारशाखा सुंदर कोरीव कामाने अलंकृत केली असून याच्या पंचशाखा आपल्याला वेगळ्या दाखविता येतात.

चित्र क्रमांक २९ : मुख्य द्वार पंचशाखा – डावीकडे मकरावर गंगा व उजवीकडे कासवावर यमुना



मंदिरावरील द्वारशाखांच्या एकेका शाखेकडे जर आपण बारकाईने निरखून पाहिले तर थक्क व्हायला होते इतके सुंदर बारीक काम यावर आढळते. सोबतच्या छायाचित्रात अशा एका शाखेचे जवळचे चित्र आहे. यात आपल्याला प्राणी, घोडेस्वार स्पष्टपणे पाहता येतात आणि त्याचबरोबर शेजारील घंटीच्या कड्यादेखील. (जोगे २०२४ )



चित्र क्रमांक ३० : गर्भगृह द्वारशाखा – जवळून घेतलेले छायाचित्र

## गर्भगृह

गर्भगृह हे मंदिराच्या मुख्य देवतेच्या मूर्तीचे स्थान आहे. शिवमंदिरातील गर्भगृहात शिवलिंगाची स्थापना केलेली असते. शक्यतो गर्भगृहात इतर प्रेक्षणीय मूर्ती नसतात तसेच याही मंदिरात नाहीत. या गर्भगृहातील शिवलिंगाची भाविकांकडून नेमाने पूजा होत असते.

## वितान

वितान म्हणजे मंदिराच्या आतल्या बाजूने असलेले छत. मंदिराची मुख्य प्रवेशद्वारे, मंडप, अंतराळ या ठिकाणी जे वर्तुळाकार छत असते त्यावर निसर्गातील गोष्टींसारखे वेगवेगळे आकार घडवून एक नक्षी केलेली असते. या सुंदर छतालाच मंदिराचे वितान म्हणतात. या मंदिरातदेखील नंदीमंडप, पूर्व, उत्तर व दक्षिण अर्धमंडप आणि अंतराळ या ठिकाणी उत्कृष्ट विनां आहेत. यातील केंद्रस्थानी केळ्याच्या घडाप्रमाणे दिसणारा अलंकृत खराब असून आजूबाजूला सुंदर फुलांची नक्षी आपल्याला आढळून येते.



चित्र क्रमांक ३१ : वितान, मध्यभागी केलफुल अथवा घड – सभोवताली नक्षी

# प्रकरण ७: उल्लेखनीय मूर्ती

मंदिराच्या नंदीमंडपावर, बाह्य भागावर, उत्तर आणि दक्षिण अर्धमंडपांवर, मुख्यमंडपातील खांबांवर आणि आवारात असलेल्या पंचायनातील इतर चार मंदिरांवर असंख्य मूर्ती आणि कथांचे अंकन केलेले आढळते त्यातील काही मूर्तींची व मूर्तीकथांची ओळख आपण या भागात करून घेऊया.

## (१) नंदीमंडप

गोंदेश्वर मंदिराच्या पूर्व बाजूच्या प्रवेशद्वाराच्या अगदी समोर, जगतीवर, छोटासा पण सुंदर नंदीमंडप आहे. यापाशी यायला पायऱ्या चढाव्या लागतात तसेच याचीही उंची जास्त असल्यामुळे नंदीपाशी पोहोचण्यासाठी अजून काही पायऱ्या चालून जावे लागते. पण याचमुळे या नंदीमंडपाला बाह्यभाग देखील मिळाला आहे आणि त्याच मुळे या बाह्यभागावर अनेक मूर्तींचे अंकन केलेले आपल्याला आढळते. यात सुरसुंदरी आहेत, दर्पणसुंदरी, मर्कटसुंदरी या दोन्ही बाजूंवर असून नंदीच्या पाठीमागील (पूर्व) भागाकडे भिंतीवर वराह अवतार कोरलेला आपल्याला आढळून येतो. एक छोटा त्रिविक्रम अवतार येथे आहे आणि याच्या सोबतच काही मैथुन शिल्पे आपल्याला या नंदीमंडपावर आढळून येतात.

चित्र क्रमांक ३२ : नंदीमंडपाकडे नेणाऱ्या पायऱ्या






चित्र क्रमांक ३३ : नंदीमंडपाच्या पूर्वेकडील वराह अवतार



चित्र क्रमांक ३४ : नंदीमंडपातील नंदी

नंदीमंडपातील नंदी नंतरच्या काळातील असला तरीदेखील उत्कृष्ट शिल्पाकृतीने नटलेला आहे. त्याच्या गळ्यातील घंटांची माळा, त्या माळेला त्याच्या पाठीवर वशिंडापाशी मारलेली गाठ, शिल्पकाराने अत्यंत उत्कृष्टरित्या दर्शविली आहे. त्याच्या खुरातील बारकावेदेखील आपल्याला सहज न्याहाळता येतात.

## (२) मंदिराचा बाह्यभाग

गोंदेश्वर मंदिर जरी सुस्थितीत असलेले मंदिर असले तरी या मंदिराच्या बाह्य भागावर खूप मोठी व सुंदर कथाशिल्पे आढळत नाहीत भद्र आणि देवकोष्ठातील मूर्ती देखील तोडफोड झालेल्या अवस्थेत आहेत. शूरसेनकातील मूर्तीचे अंदाज बांधावे लागतात. मात्र अर्धमंडपातील भिंतींवर आपल्याला रामायणातील काही प्रसंग कोरलेले आढळतात.

दक्षिण भद्र - मंदिराच्या दक्षिण भद्रावरील अधिष्ठानात आपल्याला ३ मुखांची ब्रह्माणीची मूर्ती आढळून येते. त्यावर असलेले देवकोष्ठ मात्र मोकळेच आहे. शिखरावरील शूरसेनकात असलेली मूर्ती भग्नावस्थेत आहे. या मूर्तीचा वीरासनात बसल्याचा भाग आपल्याला दिसतो त्यावरून ती गरुडाची असण्याची शक्यता आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. या बाजूने पाहताना आपल्याला मंदिराचे इतर भाग, जसे कापिली, मुख्यमंडपात प्रवेशासाठी असणारा दक्षिण अर्धमंडप, समोरचा प्रवेशमंडप, नंदीमंडप आणि पूर्व प्रवेशद्वार हे सारेच पाहायला मिळते.

उत्तर भद्र - अशाच प्रकार उत्तरेकडील भद्राच्या सर्वात खालच्या अधिष्ठानात जे मकरप्रणाल आहे त्यावर असलेली मूर्ती वैष्णवी देवीची (अथवा लक्ष्मीची) (चित्र क्रमांक 26: उत्तर भद्र व मकरप्रणाल) असावी असे दिसते व त्यामुळेच सर्वात पाठीमागे म्हणजे पश्चिम भद्राच्या मोकळ्या असलेल्या जागेत कधीकाळी माहेश्वरी देवी असण्याची शक्यता वर्तविता येऊ शकते.

चित्र क्रमांक ३५ : दक्षिण भद्र





चित्र क्रमांक ३६ : ब्रह्माणि-दक्षिण भद्र-अधिष्ठान

## (३) दक्षिण अर्धमंडप

या अर्धमंडपाचा रेखांकित पट्टिकेचा सर्वात खालचा भाग म्हणजे राजसेनक, त्यावर वेदिका आहे. वेदिकेवरील कठड्यासारखा भाग जो आहे तो कक्ष. याच्या आतील बाजूस आसने असतात. या दक्षिण अर्धमंडपाच्या राजसेनकावर नक्षीकाम कोरलेले आहे तर वेदिकेवर सुरसुंदऱ्या आहेत त्यांच्या डावीकडे हनुमंत आणि कामदेव यांच्या मुर्त्या सहजच ओळखू येतात. म्हणजेच एकाच पट्टिकेवर हनुमंत, कामदेव आणि विविध सुरसुंदऱ्या दर्शविण्यात शिल्पकाराचा नेमका काहीतरी उद्देश असला पाहिजे.

आणि कक्षाच्या भागावर (सर्वात वरची पट्टीका) रामायणातील प्रसंग कोरलेले आहेत. यात डावीकडे रावणानुग्रहाचे लहानसेच पण सुंदर शिल्प आहे. (जोगे २०२४ )यातून आपल्याला रावणाचे सामर्थ्य दृष्टीस पडते. पुढची शिल्पे हनुमंताशी संबंधित प्रसंगांची आहेत. या मंदिरात विविध ठिकाणी एकंदरीतच हनुमंताची बरीच शिल्पे कोरलेली आढळून येतात. रावणानुग्रह शिल्पानंतर रावण व मंदोदरी एकत्र बसून चर्चा करतानाचे शिल्प आहे. अशोकवाटिकेत वृक्षांची नासधूस करणारा हनुमंत, पुढे त्याला राक्षसांनी पकडल्याचे शिल्प, आणि मध्ये त्याला पकडून रावणासमोर उभे केल्याचे शिल्प आहे.



चित्र क्रमांक ३७ : डावीकडून दुसरे रावणानुग्रह , पुढे रावण मंदोदरी, हनुमंत आदि शिल्पे

याच्याच छतावर आपल्याला सामाजिक जीवनाचे अनेक पैलू पाहायला मिळतात. यात हत्तीच्या द्वंद्व युद्धाचे दृश्य आहे व बरेच लोक ते मनोरंजनाचे साधन म्हणून पाहत आहेत. एका कोपऱ्यात समुद्रमंथनाच्या दृश्य आहे, याचे वैशिष्ट्य म्हणजे या दृश्यात आपल्याला पहिल्यांदाच गणपती कोरलेला पाहायला मिळतो. याच छतावर आपल्याला दशावतार देखील दिसतात आणि रामायणातील अजून एक प्रसंग म्हणजे वाली सुग्रीवाचे द्वंद्व युद्ध देखील दिसते. मागे उभ्या असलेल्या धनुर्धारी रामामुळे आपल्याला ते शिल्प ओळखता येते.



चित्र क्रमांक ३८ : समुद्रमंथन – यात आपल्याला गणपती देखील दिसतो



चित्र क्रमांक ३९ : हत्तींची झुंज – मनोरंजनाचे साधन

या अर्धमंडपाचे प्रवेशद्वार देखील पाच शाखांनी सजविलेले आहे. यातील सर्वात आतल्या शाखांवर कासवावरील यमुना आणि मगरींवरील गंगा आपल्याला समजू शकते. व्याल शाखा, रत्न शाखा, स्तंभ शाखा, नर शाखा व लता शाखा अशा पाच शाखा सुस्थितीत असून आपल्याला दक्षिण द्वारावर सहज ओळखता येतात. या द्वारशाखांच्या वरच्या भागात प्रवेशद्वारावर सप्तमातृकांचे अंकन केलेले आहे



चित्र क्रमांक ४० : वाली सुग्रीव युद्ध व ते पहाणारे धनुर्धर राम व लक्ष्मण

## (४) उत्तर अर्धमंडप

मंदिराच्या उत्तरेकडील अर्धमंडप सुस्थितीत नाही. तरीदेखील त्याच्या वरच्या बाजूस काही उल्लेखनीय शिल्पे आहेत. त्यातील एक म्हणजे शिवपार्वतीचा सारीपाटाचा खेळ. या खेळात शिव आपल्या प्रिय वाहनाला, नंदीला या खेळात हरले आहेत व म्हणून पार्वतीचे गं नंदीला आपल्या बाजूला घेऊन जात आहेत अशी ती कथा. तर अजून एका पट्टिकेवर मेंढ्यांची झुंज दाखविली आहे. यात तत्कालीन लोकांच्या मनोरंजनाच्या साधनांवर प्रकाश पडतो.

याच अर्धमंडपाच्या बाहेरच्या बाजूला एका नटलेल्या, अलंकृत सुंदर स्त्रीचे शिल्प आहे. तिचा साज, तिने डोक्यावरून एखाद्या राणीप्रमाणे घेतलेले झग्यासारखे पाठीमायागे पायघोळ असलेले वस्त्र, तिची केशरचना आणि तिच्या मागील बाजूंची वेलबुट्टी उल्लेखनीय आहे.



चित्र क्रमांक ४१ : शिव पार्वती सारीपाट खेळताना खेळात हरलेल्या नंदीला पार्वतीचे गण घेऊन जाताना



चित्र क्रमांक ४२ : मेंढा युद्ध – मनोरंजनाचा खेळ



चित्र क्रमांक ४३ : सौन्दर्यवती

## (५) मंदिराचा मुख्य मंडप

### प्रवेशमंडपावरील शिल्प पट्टीका

मुख्य प्रवेशद्वार मंडपावर पण काही आकर्षक शिल्पे आहेत त्यातील एक म्हणजे सेतुबंधाचे. या छोट्याश्या शिल्पात देखील धनुष्य घेतलेला राम आणि त्याला मदत करणारी वानरांची टोळी आपल्याला चटकन ओळखू येते. समुद्राच्या लहरी, त्यावर दगडाने बांधलेला सेतू आणि काही वानरांच्या हातातील दगड आपल्याला या शिल्पाची ओळख करून देतात.



चित्र क्रमांक ४४ : सेतुबंधाचे शिल्प

याच्याच शेजारी हिरण्यकश्यपू बरोबर युद्ध करणारा नरसिंह, महिषासुरमर्दिनी, गणेश व नृत्य-चामुंडा अशी काही शिल्पे दिसतात तर डाव्या बाजूच्या शिल्पांची ओळख पटवता आली नाही.

खालच्या पट्टिकेमध्ये विविध स्थितीतील सुरसुंदऱ्या आहेत.



चित्र क्रमांक ४५ : मुख्य प्रवेशद्वार – सेतुबंधासह इतर शिल्पे

## मंडपातील शिल्पे

### हनुमंत जंबुमाळी युद्ध

रामायणातील युद्ध कांडाच्या ४३ व्या सर्गात राम रावण यांच्यातील युद्धाच्या वेळी राक्षस सेना आणि वानरसेना एकमेकाला भिडत असताना जी द्वंद्वयुद्धे येतात त्यात हनुमंत व जंबुमाळीचे युद्ध आहे. हे युद्ध आग्नेय खांबावरील एका छोट्या पॅनल मध्ये कोरलेले आहे. यात दोघे एकमेकांवर त्वेषाने धावून जाताना दाखविले असून या दोघांच्या मध्ये एक किर्तीमुखही कोरलेला आहे. (जोगे २०२४ )



चित्र क्रमांक ४६ : हनुमंत जंबुमाळी युद्धाचे दृश्य

## नरसिंहाचे सुंदर शिल्पांकन

नरसिंहाची अनेक शिल्पे आपल्याला बऱ्याच ठिकाणी आढळून येतात. यादव राजांचे हे दैवतच. त्यामुळेच काही यादव राजांच्या वंशावळीतील नावे देखील नरसिंह या नावावरून घेतलेली आहेत. मंदिराच्या खांबावरील नरसिंहाची ही छोटी शिल्पपट्टीका पण अतिशय सुबकपणे कोरलेली असून यात नरसिंहाच्या गळ्यातील माळा, त्याच्या हातातील गदा व चक्र, ही शस्त्रे एवढ्या छोट्याशा शिल्पात सुंदर कोरली आहेत. डावीकडे बाळ प्रल्हाद नमस्कार करत बसलेला आहे. याही शिल्पाच्या खाली एक छोटा कीर्तिमुख कोरलेला आहे.



चित्र क्रमांक ४७ : हिरण्यकश्यपूचा नरसिंहाकडून वध



चित्र क्रमांक ४८ : महिषासुरमर्दिनी



चित्र क्रमांक ४९ : पुत्रवल्लभा

## भिक्षाटन शिव व कामदेव

लिंगोद्भव शिवाच्या स्वरूपाने कालभैरवाला जन्म देत ब्रम्हाचे ५वे शीर कापले. या ब्रह्महत्येच्या पापामुळे ते शीर त्याचा हाताला चिकटले. म्हणून पापाचे परीक्षालन करण्या करिता शिवाने भैरवाचे रुप टाकून कापालिकाचे (ब्रम्हाच्या कपालातून भिक्षा मागणारा) रुप धारण केले. हाच कापालिक म्हणजे देशोदेशी भिक्षाटन करत फिरणारा शिव.



चित्र क्रमांक ५० : भिक्षाटन शिव



चित्र क्रमांक ५१ : कामदेव मदन – हातात ऊस

या मंदिराच्या वायव्य स्तंभावर हे "भिक्षाटन" रुप आढळते. भिक्षाटन करणारा हा शिव तिन्ही लोकात भटकतो तसा तो देवदार वनात (अथवा दारुक वनात) देखील जातो. तेथे ऋषीमुनी यज्ञ कार्यात गुंतलेले असतात. ऋषीपत्नी या शिवाचे नग्न, पण तेजस्वी रुप पाहून मोहित होतात व त्यांची वस्त्रे ढळतात, अशीही शिल्पे इतर मंदिरांमध्ये असतात. यात शिल्पांमध्ये बरेचदा शिवाच्या पायात खडावा देखील दाखविल्या जातात. (जोगे २०२४ ) तशाच खडावा गोंदेश्वर मंदिरातील या शिल्पात देखील आहेत.

पुराणातील कथांनुसार यात वैविध्य आढळते. वामन पुराणात हि कथा थोड्या वेगळ्या स्वरूपात येते. या कथेनुसार प्रजापती दक्षाच्या यज्ञात सती पार्वतीने स्वतःला झोकून दिल्यावर तिच्या विरहाने व्याकुळ झालेला असताना त्याला मदनाने त्याला उन्माद आणि विजृम्भण नावाचे दोन बाण मारून विद्ध केले. हा शिव संतापात विश्वात भ्रमण करून जगताला पीडा देत असताना यक्षाधिपती कुबेराचा पुत्र "पांचालिकाने" त्याला पाहिले व शिवाकडून ही दोन्ही अस्त्रे धारण करत तो "पांचालिकेश" झाला आणि शिव पुढे विंध्य पर्वताकडे भिक्षाटनासाठी निघाला तोच शिव म्हणजे हा "भिक्षाटन शिव". पण शंकराला त्या अवस्थेत पाहून वसिष्ठ पत्नी अरुंधती आणि अत्री पत्नी अनुसूया यांच्या व्यतिरिक्त इतर ऋषीपत्नी मोहित होऊ लागल्या, त्यांची वस्त्रे ढळू लागली आणि म्हणून संतप्त झालेल्या ऋषींनी शिवलिंग पृथ्वीवर पतित होईल असा शाप दिला आणि शंकराची कामभावना गळून पडली, आणि शंकर तेथून अंतर्धान पावले.

याप्रकारे शांत झालेले शंकर वनांत शांत बसलेले असताना कामदेव मदन त्यांच्या मागावर आला. त्याला पाहून शंकर क्रोधीत झाले व त्यांनी आपला तृतीय नेत्र उघडून त्याला भस्म केले, म्हणजेच त्यांनी कामभावनेवर संपूर्ण विजय प्राप्त केला. भस्म झालेला कामदेव मदन त्यानंतर विना अंगाचा म्हणजेच **अनंग** म्हणून फिरू लागला.

गोंदेश्वराच्या या मंदिरात वायव्य स्तंभावर भिक्षाटन शिव तर ईशान्य स्तंभावर मदन शिल्पित केलेला आहे. या भिक्षाटन शिवाच्या खांद्यावर दंड आहे, भिक्षापात्र आहे आणि डाव्या हातात डमरूदेखील आहे. भैरवाची विविध रूपे देखील आपल्याला या स्तंभांवर आढळून येतात.

शिवाची रूपे जशी आपल्याला आढळतात तशीच शक्तीचीही. चामुंडा, महिषासुरमर्दिनी अशा स्वरूपात देवीचे अंकन आढळते.

## लोकजीवन

लोकजीवनातील मनोरंजन हे ज्या विविध शिल्पांद्वारे दाखविले आहे त्यात हत्तीची झुंज , मेंढ्यांची झुंज, सारीपाटादि खेळ याचबरोबर, नर्तन, वादन या कला, मिरवणूका देखील येतात. अशीही अनेक शिल्पे मंदिरातील शिल्पपट्टिकांवर आहेत. बरेच ठिकाणी आपल्याला लोकजीवनाचे, गृहस्थ जीवनाचे चित्रण आढळते. अशाच एका पट्टीकेवर आपल्याला गृहकलह देखील आढळतो ज्यात एक पुरुष एका स्त्रीचे केश धरून तिला खेचतो आहे आणि एका पायाने तिच्यावर लत्ताप्रहार देखील करत आहे.



चित्र क्रमांक ५२ : गृहकलह



चित्र क्रमांक ५३ : अशोकवाटीकेत सीता



चित्र क्रमांक ५४ : नर्तन, वादन

यासोबत आढळतात ती श्रीविष्णूची रूपे. अष्टभुज विष्णू येथे लक्ष्मीसह आहे तसंच नृत्य विष्णू देखील आहे.

हि शिल्पे पाहताना त्यावरील कोरीव काम न्याहाळून पाहायला हवे तेव्हा त्यातली रंगत समजते. असेच एक पट्टीका शिल्प आहे ते मकराचे. त्याच्याकडे पाहिले असता त्याच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या मोत्यांच्या माला, आजूबाजूला फुलांच्या नक्षीचा केलेला वापर, हे सारेच पाहण्यासारखे आहे.



चित्र क्रमांक ५५ : मकराचे सुंदर नक्षीकाम

## मैथुन शिल्पातील संदेश

मंदिरात अनेक मैथुन शिल्पे आहेत. त्यातील एका विशेष शिल्पाबद्दल येथे उल्लेख करायला हवा. या शिल्पात मैथुन करणारे युगुल दाखविले आहे. या युगुलाच्या डावीकडे एक व्यक्ती पाठ फिरवून उभी आहे तर दुसऱ्या बाजूची व्यक्ती एक डोळा झाकून उभी आहेत तर दुसऱ्या डोळ्याने चोरून हा प्रणय पाहते आहे. मैथुन या विषयाला समाजात (तत्कालीन) कसे पाहिले जात असे. त्यातून काय शिकायला हवे अशा अर्थाने हे शिल्प कोरलेले असावे. म्हणजे त्याकडे पाठ न फिरवता, चोरट्या नजरेने न पाहता, आपल्या जीवनाचे अविभाज्य अंग म्हणून पाहिले पाहिजे असा उद्देश कदाचित शिल्पकर्त्याचा असावा.



चित्र क्रमांक ५६ : मैथुन शिल्प

# प्रकरण ८. उपसंहार

मंदिरांचा अभ्यास हा एक वेगळाच आनंद देणारा विषय आहे आणि त्यातही ते मंदिर जितके पुरातन तितकेच हा आनंदही जास्त. मंदिरांचा बराच अभ्यास झालाय तो मात्र इंग्रजांच्या काळात आणि त्यामुळेच बहुसंख्य संदर्भ पुस्तके उपलब्ध आहेत ती देखील इंग्रजी भाषेतच. स्टेला क्रॅमरीश, जेम्स बर्जेस, हेन्री कोसेन्स अशा अनेक लेखकांनी मंदिर वास्तुशास्त्राचा सखोल अभ्यास करून त्यावर इंग्रजी मध्ये ग्रंथ लिहिले आहेत जे आज आपल्याला बरीच अंशी उपयुक्त ठरतात. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी स्थापन केलेल्या भारतीय पुरातत्व खात्याने (Archaeological Survey of India) देखील या क्षेत्रात बरेच काम केले असून स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी बऱ्याच मंदिरांचे जतनआणि पुनर्बांधणी देखील केली आहे. अशी सर्वच पुरातन मंदिरे त्यांच्या अखत्यारीत असून हे सिन्नरचे गोंदेश्वर मंदिर देखील त्यातच येते. आजही या मंदिर परिसरात ASI चे बरेच काम सुरु असलेले आपल्याला दिसते.

नाशिक आणि सिन्नर परिसरात बरेचसे शिलालेख, ताम्रपट आणि नाणी सापडली आहेत. यात मराठी आणि कन्नड या दोन्ही लिपि आढळल्या आहेत. त्यांच्या अभ्यासावरूनच या मंदिराचा इतिहास ज्ञात होण्यास बरीच मदत झाली आहे. त्यामुळे सुरुवातीच्या काळात ११ व्या शतकातील मानले गेलेले हे मंदिर आता १३ व्या शतकातील असावे याकडे अभ्यासकांचा कल आहे. ताम्रपट, मंदिर शैली, इतिहास, परिसरातील इतर मंदिरे आणि त्यांची शैली या साऱ्यांवरून हा अभ्यास करायचे काम सुरु आहे. हे मंदिर त्याच्या पंचायतन वैशिष्ट्यामुळे अभ्यासकांच्याही आकर्षणाचे केंद्र बनत आहे. या अभ्यासातून नवनवीन माहिती पुढे येऊ शकेल त्यामुळे याचा अभ्यास होऊन यावर पुस्तके निघणेदेखील आवश्यक आहे जेणेकरून सर्वसामान्य हौशी अभ्यासकांनाही याची माहिती मिळू शकेल.

# संदर्भ

Burges, James. 1910. *History of Indian and Eastern Architecture.* London: John Murray.

Cousens, Henry. 1931. *Mediaeval Temples Of The Dakhan.* Calcutta: Government of India.

n.d. *JAGATI.* https://en.wikipedia.org/wiki/Jagati_(temple).

Kanitkar, Dr Mrs Kumud. 2014. *Ambarnath Shivalay.* Mumbai: Dilip Kanitkar.


Parul University. 2016. "Evolution of Bhumija Shikhara and Distribution of Bhumija Shrines in India." *Chitrolekha International Magazine on Art and Design,* 6 (3): 10.

Suri, Jayasimha, SG Kolarkar, and Mangesh Prakashan. n.d. "Seuna (Yadava) dynasty." *Wikipedia.* Accessed May 8, 2024. https://en.wikipedia.org/wiki/Seuna_(Yadava)_dynasty.

**डॉक्टर गोपाल जोगे यांची सह्याद्री सामाजिक संस्थायांनी एप्रिल २०२४ मध्ये आयोजित केलेली गोंदेश्वर मंदिर भेट - गोंदेश्वर मंदिराचा इतिहास व बांधकाम शैली.**

श्री महेश शिरसाठ, सिन्नर यांचे, वाई भटकंती सह्याद्रीची परिवार यांनी आयोजित केलेले ऑनलाईन व्याख्यान ११ जून २०२४ . पंचायतन मंदिर गोंदेश्वर

## कृष्णाख्यान - महामानव कृष्णाचे चरित्र




**या आधी माझे "कृष्णाख्यान - महामानव कृष्णाचे चरित्र" हे पुस्तक प्रसिद्ध झाले असून हे पुस्तक अमेझॉन व इतरत्र उपलब्ध आहे . त्याचा बार कोड व लिंक येथे देत आहे. तेथून तुम्ही ते पुस्तक घेऊ शकता.**

थेट अमेझॉन वर जाण्यासाठी लिंक

भारतीय मनावर श्रीकृष्ण या नावाची मोहिनी गेली किमान पाच सहस्रके कायम आहे. प्रत्येकाचा त्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असला तरी या सर्वांचे भारावलेपण हा त्यातील सामायिक दुवा आहे. कुणी त्याची भक्ती करते, तर कुणी त्यात राजकारणधुरंधर व्यक्तिमत्त्व शोधते. त्याच्या कार्याचा आवाका, त्याची निर्णयक्षमता इतकी विलक्षण आहे की, आपण चकित झाल्याशिवाय रहात नाही. आणि मग आज पाच हजार वर्षांनंतर जर आपली ही परिस्थिती असेल तर ज्या काळात तो जगला तो व त्याच्यानंतर लगतचा काळ यात तो दंतकथा बनून राहिला नसता तरच नवल. त्याच्या कार्यकर्तृत्वावर चमत्कारांची आवरणे चढत गेली. वास्तविक पाहता त्याच्या कार्याला यातील कोणत्याही आवरणाची आवश्यकता नाही असे त्याचे कर्तृत्व निर्विवाद होते. भौतिक नियमांच्या चौकटीतच राहून त्याने त्याची अचाट कार्ये केली अन् त्याच्यावर प्रेम करणाऱ्या हजारो भक्तगणांनी त्याला 'भगवंत बनविण्यासाठी' ही भौतिक नियमांची आणि तर्कवादाची चौकट मोडून टाकली आणि त्याच्याकडून त्याने कदाचित कधीही न केलेली अचाट कामेदेखील करून घेतली!

कृष्णाख्यान कशासाठी ?

- कृष्णाचे मानवी रूप समजून घेण्यासाठी.
- चमत्कार विरहीत कृष्ण समजून घेण्यासाठी,
- कृष्ण चरित्रातील चमत्कारांची कारणमीमांसा जाणून घेण्यासाठी.
- मानवी पातळीवर महाभारत कसे घडले असेल हे कृष्ण-चरित्राद्वारे समजावून घेण्यासाठी.
- कृष्ण किती वर्षे जगाला? त्याच्या आयुष्यातील कोणत्या घटना त्याच्या वयाच्या कोणत्या वर्षी घडल्या? या प्रश्नांची उत्तरे सप्रमाण मिळविण्यासाठी.
- कृष्णाचे संपूर्ण चरित्र समजून घेण्यासाठी.


Ebook Title